पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - १७

**सभावृत्तांत**

दिनांक - ०६/०८/२०२१ वेळ - दुपारी ३.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माविधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक ०६/०८/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील तिस-या मजल्यावरील मा.सभापती, विधी समिती यांचे दालनात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/ नवि-१४ दि. ३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालीलप्रमाणे काही सन्मा.सदस्य सभागृहात तर काही सन्मा.सदस्य ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) उपस्थित होते.

१. **मा.स्वीनल कपिल म्हेत्रे - सभापती**
२. मा.सुजाता सुनिल पालांडे
३. मा.चौगुले सीमा दत्तात्रय
४. मा.गोफणे अनुराधा देविदास

या शिवाय मा.सुभाष इंगळे - उप आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.३) मा.विधी समितीच्या अधिकारांबाबत - मा.सुजाता पालांडे, मा.अनुराधा गोफणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) दोपोडी प्र.क्र.३० आनंदवन येथील कुष्ठपिडीत वसाहतीतील अपंग व कृष्ठपीडीत रुग्णांकरिता(ड्रेसर) म्हणून काम करणारे सौ.सुरेखा डॅनिअल दोडमणी तसेच सौ.लता अनिल कांबळे यांची दरमहा रक्कम रु.१५,०००/- (अक्षरी पंधरा हजार रु.फक्त) मानधनावर नेमणुकी बाबत. - मा.सुजाता पालांडे, मा.अनुराधा गोफणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) उपअभियंता (स्थापत्य) पदोन्नतीबाबत - मा.सुजाता पालांडे, मा.अनुराधा गोफणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) श्री.सुनिलदत्त लहानू नरोटे, उपअभियंता स्थापत्य यांना कार्यकारी अभियंता पदावर पदोन्नती देणेबाबत - मा.सुजाता पालांडे, मा.अनुराधा गोफणे यांचा प्रस्ताव.

----------

ठराव क्रमांक - ४३ विषय क्रमांक - ०१

दिनांक - ०६/०८/२०२१

सुचक : मा.सुजाता पालांडे अनुमोदक : मा.अनुराधा गोफणे

संदर्भ - मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/२/कावि/८६४/२०२१, दि.२२/०७/२०२१

विषय - कार्यकारी अभियंता स्थापत्य पदावरिल पदोन्नती बाबत.

विषय क्र.१ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४४ विषय क्रमांक - ०२

दिनांक - ०६/०८/२०२१

सुचक : मा.सुजाता पालांडे अनुमोदक : मा.अनुराधा गोफणे

संदर्भ : मा.अतिरिक्त आयुक्त, (१) यांचेकडील पत्र क्र.प्रशा/१/कावि/८५४/२०२१, दि.२८/०७/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या रुग्णालयांकरीता स्थायी आस्थापनेवरील गट “अ”मधील रिक्त असणारी पदे सरळसेवा प्रवेशाने भरण्यासाठी जाहिरात क्र.७३/२०१९ दि.१३/०९/२०१९ प्रसिद्ध करण्यात आली होती. विशेषतज्ञ अधिका-यांची रिक्त पदे भरणेकामी उमेदवारांचे वय, शैक्षणिक अर्हता, अनुभव, जाती प्रवर्ग व समांतर आरक्षण इत्यादि विषयक कागदपत्रांची तपासणी होणे आवश्यक असल्याने ऑनलाईनद्वारे अर्ज केलेले उमेदवारांना जाहिर निवेदन, ई-मेलद्वारे कागदपत्र तपासणी व मौखिक मुलाखतीस उपस्थित राहणेबाबत कळविणेत आले होते.ऑनलाईन अर्ज केलेल्या उमेदवारांपैकी मौखिक मुलाखतीस उपस्थित राहीलेल्या व सेवायोजन कार्यालयाकडील संकेतस्थळावरुन उपलब्ध झालेल्या उमेदवारांची कागदपत्रांची पडताळणी व मौखिक मुलाखती दिनांक १८/०९/२०२० रोजी घेण्यात आलेल्या आहेत.

१) नामनिर्देशनाव्दारे अर्ज मागविण्याची पध्दती :- www.pcmcindia.gov.in या महापालिकेच्या संकेतस्थळामार्फत Online पध्दतीने

२) विशेषतज्ञ पदांची वेतनश्रेणी :- अ.क्र.०१ ते ०३ वर नमूद पदांना र.रु.१५६००-३९१०० अँके.ग्रेड पे

रु. ७६०० अ.क्र.०४ ते ११ वर नमूद पदांना र.रु.१५६००-३९१०० अँके.ग्रेड पे रु.६६०० (सहाव्या वेतन योगानुसार)

३) नामनिर्देशनाव्दारे भरावयाच्या पदांचा तपशिल, उमेदवाराचे नाव, नेमणूक प्रवर्ग :- सोबतचे परिशिष्ठ “अ”नुसार

निवड समितीने उमेदवारांच्या मौखिक मुलाखती घेतल्या असून मुलाखती दरम्यान जाहिरातीमध्ये नमूद केलेप्रमाणे उमेदवारांनी सादर केलेली शैक्षणिक अर्हतेची कागदपत्रे.अनुभव, विषयातील ज्ञान इत्यादीनुसार उमेदवारांना गुण देण्यात आलेले आहेत. सदर गुण तक्ता विचारात घेऊन सोबतचे प्रपत्र ‘अ’नुसार पात्र उमेदवारांची निवड यादी सादर केली आहे. त्या यादीमधील विशेषतज्ञ अभिनामाची गट अ मधील पदे सरळसेवेने भरण्यास मान्यता

मिळणेकामी महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४५ विषय क्रमांक - ०३

दिनांक - ०६/०८/२०२१

सुचक : मा.सुजाता पालांडे अनुमोदक : मा.अनुराधा गोफणे

संदर्भ : मा.सुजाता पालांडे, मा.अनुराधा गोफणे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीकडे मा.महापालिका सभेने विविध अधिकार प्रदान केले आहेत. त्यानुसार मा.विधी समितीची मान्यतेकामी आवश्यक विषय ब-याचवेळा विधी समितीकडे येणारे विषय सदस्य पारित ठराव करुन मा.स्थायी समिती आणि मा.महापालिका सभेपुढे परस्पर ठेवून मान्यता घेतली जाते, त्यामुळे मा.विधी समितीकडे विषय सादर होत नाहीत. तरी, यापुढे मा.विधी समितीचे अधिकारात असलेले विषय परस्पर मा.स्थायी समिती किंवा मा.महापालिका सभेपुढे सदस्य पारित ठराव सादर करु नयेत आणि जरी सन्मा.सदस्यांच्या प्रस्ताव/उपसुचनेनुसार अशा विषयांना मान्यता देण्यात आली तरी असे विषय रितसर प्रशासना मार्फत मा.विधी समितीपुढे सादर करून मान्यता मिळणेकामी महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४६ विषय क्रमांक - ०४

दिनांक - ०६/०८/२०२१

सुचक : मा.सुजाता पालांडे अनुमोदक : मा.अनुराधा गोफणे

संदर्भ : मा.सुजाता पालांडे, मा.अनुराधा गोफणे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र३० दापोडी आनंदवन येथील कृष्ठवसाहत ही झोपडपट्टी गेल्या ७० ते ८० वर्षापासून या ठिकाणी वसलेली असून या वसाहातीतील जवळपास १५० कुटुंबातील ३५० ते ४०० नागरिक हे बहुविकलांग कृष्ठरोगी व अपंग (महिला तसेच पुरुष) नागरिक आपल्या कुटुंबांसमवेत या ठिकाणी राहतात. या कृष्ठरुग्णांना शरिरावर जखमा असल्याकारणाने त्यांचे वेळोवेळी मलमपट्टी (वर्णोपचार) करण्याचे काम सौ.सुरेखा डॅनिअल दोडमणी तसेच सौ.लता अनिल कांबळे स्वतः कृष्ठपीडीत असून ते प्रमाणिकपणे त्यांची सुश्रुषा करीत असतात. सौ.सुरेखा डॅनिअल दोडमणी तसेच सौ.लता अनिल कांबळे त्यांचे आजवरचे काम व अनुभव विचारात घेवून नाशिक तसेच कल्याण डोंबिवली महापालिका धर्तीवर पिंपरी चिंचवड महानगसालिके मार्फत दापोडी येथील आनंदवन या बहुविकलांग कृष्ठरोगी व अपंग नागरिकांची वेळोवेळी ड्रेसिंग करण्याकरिता दरमहा रक्कम रु.१५,०००/- (अक्षरी पंधरा हजार रु.फक्त) मानधनावर नियुक्ती करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४७ विषय क्रमांक - ०५

दिनांक - ०६/०८/२०२१

सुचक : मा.सुजाता पालांडे अनुमोदक : मा.अनुराधा गोफणे

संदर्भ : मा.सुजाता पालांडे, मा.अनुराधा गोफणे यांचा प्रस्ताव.

श्री.स्वामीजंगम जी.डी. हे स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदावर दिनांक-१९/१२/१९८९ पासून कार्यरत असून अभियांत्रिकी अधिकारी महाविद्यालय नाशिक यांची कनिष्ठ अभियंता व्यावसायीक परिक्षा पास झाल्यानंतर सन २००२ मध्ये कनिष्ठ अभियंता पदाची वेतणश्रेणी देण्यात आली व दिनांक २८/०६/२००४ रोजी कनिष्ठ अभियंता पदी म.न.पा.सेवेत अपग्रेड केल्यानंतर त्यांनी एकूण ३१ वर्षे ६ महिने सेवा पुर्ण केली आहे. सन २०१४ मध्ये आसाम युनिव्हर्सिटी सिल्चर आसाम या विद्यापिठामार्फत त्यांचेकडील ३ वर्षाचा स्थापत्य अभियांत्रिकी पदवीका अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेले आहेत. तसेच दिनांक-२२/०७/२०२१ च्या सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ मुंबई यांच्या पत्रान्वये पदोन्नती देणेबाबत त्यांचेकडील स्वयंस्पष्ट अभिप्राय दिलेला आहे. त्यांनी म.न.पा. मध्ये अनुसुचीत जातीचे (मागासवर्गीय) कर्मचारी असून अद्यापही त्यांना आत्तापर्यंत कोणतीही पदोन्नती न दिल्याने त्यांच्यावर झालेला अन्याय सन २००४ (कनिष्ठ अभियंता नेमणूकीपुर्वीची) पर्यंत स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदावरील १५ वर्षे सेवा कालावधीचा ३/८ सेवा कालावधी कनिष्ठ अभियंता पदाची सेवाजेष्ठता ग्राहृय धरून येणा-या मानीव तारखेनुसार त्यांना म.न.पा. सेवेत उपअभियंता (स्थापत्य) पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४८ विषय क्रमांक - ०६

दिनांक - ०६/०८/२०२१

सुचक : मा.सुजाता पालांडे अनुमोदक : मा.अनुराधा गोफणे

संदर्भ : मा.सुजाता पालांडे, मा.अनुराधा गोफणे यांचा प्रस्ताव.

शासन निर्णय क्र.बीसीस-२०१८/प्र.क्र./३६६/१६-ब, दि.०७/०५/२०२१ मधील बाब क्र.२ व ३ अंतर्गत समाविष्ठ तरतुदीनुसार दि.२५/०५/२००४ रोजी किंवा त्यापुर्वी शासन सेवेत रुजु असलेले कर्मचारी दि.२५/०५/२००४ रोजीच्या सेवाजेष्ठतेनुसार पुढील पदोन्नतीस पात्र ठरतील या निर्णयानुसार पदोन्नती देणेबाबत मान्यता देणेत आलेली आहे. त्यास अनुसरुन कार्यकारी अभियंता स्थापत्य या पदाच्या जागा रिक्त असल्यामुळे श्री.सुनिलदत्त लहानू नरोटे यांची उपअभियंता या पदावर ०६ वर्षे सेवा पुर्ण झालेली असल्यामुळे त्यांना कार्यकारी अभियंता स्थापत्य या मनपा अस्थापनेवरील मंजुर रिक्त पदावर सेवा नियम २०२० तसेच आकृतीबंध २०२० नुसार व त्यातील तरतुदीनुसार सेवाजेष्ठता, तांत्रिक व शैक्षणिक अर्हता, कार्यानुभव इत्यादी सर्व निकषास अनुसरून पात्र ठरत आहेत. सबब पिंपरी चिंचवड महानगरपालिका अस्थापनेवरील कार्यकारी अभियंता स्थापत्य ही पदे रिक्त असल्याने श्री.सुनिलदत्त लहानू नरोटे, उपअभियंता यांना कार्यकारी अभियंता स्थापत्य या पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(स्वीनल कपिल म्हेत्रे )**
**सभापती-**विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ ३८३ /२०२१
दिनांक : १०/०८/२०२१

**(उल्हास बबनराव जगताप)**
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

**विषय क्र.२ च्या लगत**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी ४११ ०१८**

**प्रपत्र-अ**

| **अ.क्र.** | **पदनाम** | **उमेदवाराचे नाव** | **नेमणूक प्रवर्ग** |
|---|---|---|---|
| १ | युरो सर्जन | डॉ.कुडलिकर उपेंद्र माधवराव | खुला |
| २ | नेफ्रोलॉजिस्ट | डॉ.बिराजदार निरज बसवराज | खुला |
| ३ | ऑन्को सर्जन | डॉ.पन्हाळे शिरीषकुमार प्रल्हाद | खुला |
| ४ | निवासी वैद्यकीय अधिकारी | डॉ.पवार मनिष नामदेव | खुला (वि.जा.(अ)) |
| ५ | अनेस्थिशियालॉजिस्ट (भूलतज्ञ) | डॉ.विधाटे वैशाली बबनराव | इतरमागासवर्ग |
| ६ | क्ष किरण शास्त्रज्ञ | डॉ.भिरुड हेमंत चंद्रकांत | इतरमागासवर्ग |
| ७ | सर्जन | डॉ.निकम राहूल मधुकर | अनुसूचित जाती |
| ८ | फिजिशियन | डॉ.सरदे कपिल सखाराम | इतरमागासवर्ग |
| ९ | बालरोग तज्ञ | डॉ.सोनी सिमा प्रविण | खुला |
| १० | अस्थिरोग तज्ञ | डॉ.पाटोळे विवेक विश्वनाथ | अनुसूचित जाती |
| ११ | त्वचा व गुप्तरोग तज्ञ | डॉ.नितनवरे गुंजन सुरेंद्र | खुला (अनु.जाती) |

सही/-
अतिरिक्त आयुक्त (१)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८